सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२

# महाराष्ट्र वनविकास (शासनाकडून अथवा वनविकास महामंडळाकडून होणा-या वनोत्पादनाच्या विक्रीवरील कर) अधिनियम, १९८३

( दिनांक १ जानेवारी, २०१५ पर्यंत सुधारित )

Maharashtra Act No. XXII of 1983

# The Maharashtra Forest Development (Tax On Sale of Forest-Produce by Government or Forest Development Corporation) Act, 1983

(*As modified upto the 1st January, 2015*)

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय आणि ग्रंथागार, नागपूर, यांनी भारतामध्ये मुद्रित केले आणि संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री व प्रकाशने, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००४, यांनी प्रसिद्ध केले.

२०१५

**(किंमत रु. ४.००)**

## महाराष्ट्र वनविकास (शासनाकडून अथवा वनविकास महामंडळाकडून होणा-या वनोत्पादनाच्या विक्रीवरील कर) अधिनियम, १९८३

### अनुक्रमणिका

**उद्देशिका**

पृष्ठे

**कलमे**


| | | |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ. . . . . . . . . | २ |
| २. | व्याख्या. . . . . . . . . | २ |
| ३. | कर आकारणे व गोळा करणे. . . . . . . . . | ३ |
| ४. | वसुली अधिका-यामार्फत कर वसुली. . . . . . . . . | ३ |
| ५. | कराच्या रकमेविरुध्द अपील. . . . . . . . . | ३ |
| ६. | कर उत्पन्नाचा विनियोग. . . . . . . . . | ३ |
| ७. | कर भरण्यापासून सूट. . . . . . . . . | ४ |
| ८. | जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे कराची थकबाकी वसूल करणे. | ४ |
| ९. | सद्भावपूर्वक केलेल्या कृत्याचे संरक्षण. . . . . . . . | ४ |
| १०. | नियम करण्याचा अधिकार. . . . . . . . . | ४ |
| ११. | दिनांक ७ डिसेंबर, १९८२ पासून १६ जानेवारी, १९८३ पर्यंत सहकारी संस्थांनी | ४ |
| | केलेले विक्रीचे व्यवहार. . . . . . . . . | ४ |
| १२. | अडचणी दूर करण्याचा अधिकार. . . . . . . . . | ५ |
| १३. | सन १९८३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३ याचे निरसन व व्यावृत्ती . . | ५ |

## सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२[1]

[महाराष्ट्र वनविकास (शासनाकडून अथवा वनविकास महामंडळाकडून होणा-या वनोत्पादनाच्या विक्रीवरील कर) [2][***] अधिनियम, १९८३]

[राज्यपाल यांची दिनांक १५ एप्रिल, १९८३ रोजी संमती मिळाल्यानंतर **महाराष्ट्र शासन राजपत्र,** भाग चार, असाधारण मध्ये दिनांक १५ एप्रिल, १९८३ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिध्द केलेला].

या अधिनियमात पुढील अधिनियमांअन्वये सुधारणा करण्यात आल्या आहेत :–

सन १९९२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ (१-८-१९९२)✝

सन २००१* चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ (२२-०६-२००१)

### राज्य शासनाकडून किंवा वनविकास महामंडळाकडून किंवा त्याच्या वतीने करण्यात येणा-या वनोत्पादनाच्या विक्रीवर वनविकास कर आकारणे व तो वसूल करणे यासाठी अधिनियम

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि महाराष्ट्राच्या राज्यपालांनी दि. ४ डिसेंबर, १९८२ रोजी महाराष्ट्र वनविकास (शासनाकडून अथवा वनविकास महामंडळाकडून होणा-या वनोत्पादनाच्या विक्रीवरील कर) अध्यादेश, १९८२ (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अध्यादेश " असा करण्यात आला आहे) हा प्रख्यापित केला होता; (१९८२ चा महा. अध्या, २०.)

**आणि ज्याअर्थी,** त्यानंतर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन दिनांक १३ डिसेंबर, १९८२ रोजी पुन्हा भरविण्यात आले होते ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे विधानमंडळाच्या अधिनियमात विवक्षित फेरबदलांसह, रुपांतर करण्यासाठी म्हणून महाराष्ट्र वनविकास (शासनाकडून अथवा वनविकास महामंडळाकडून होणा-या वनोत्पादनाच्या विक्रीवरील कर) विधेयक, १९८२ ( १९८२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५८) हे, १६ डिसेंबर, १९८२ रोजी महाराष्ट्र विधानसभेत मांडण्यात आले होते, परंतु दिनांक २४ डिसेंबर, १९८२ रोजी अधिवेशन समाप्त झाल्याने त्यात ते विधेयक संमत करण्यात आले नव्हते;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाचे अधिवेशन दिनांक १३ डिसेंबर, १९८२ रोजी पुन्हा घेण्यात आले तेव्हा, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करण्यात न आल्याने दिनांक २३ जानेवारी, १९८३ नंतर उक्त अध्यादेश अंमलात असण्याचे बंद होणार होते;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन त्यावेळी चालू नव्हते आणि उपरोल्लिखित १९८२ च्या विधानसभा विधेयक क्रमांक ५८ द्वारे करावयाच्या प्रस्तावित फेरबदलांसह, उक्त अध्यादेशाच्या तरतुदी अंमलात असण्याचे चालू राहण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक असल्याची परिस्थिती त्यावेळी अस्तित्वात होती याबद्दल त्यांची खात्री झाली होती; आणि म्हणून, महाराष्ट्र वनविकास (शासनाकडून अथवा वनविकास महामंडळाकडून होणा-या वनोत्पादनाच्या विक्रीवरील कर) (चालू राहणे) अध्यादेश, १९८३ त्यांनी १७ जानेवारी, १९८३ रोजी प्रख्यापित केला होता;

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्र वनविकास (शासनाकडून अथवा वनविकास महामंडळाकडून होणा-या वनोत्पादनाच्या विक्रीवरील कर) (चालू राहणे) अध्यादेश, १९८३, चे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे; म्हणून, भारतीय गणराज्याच्या चौतिसाव्या वर्षी, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :- (१९८३ चा महा. अध्या. ३)

---

[1] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी **महाराष्ट्र शासन राजपत्र,** असाधारण दिनांक ८ मार्च, १९८३, भाग आठ, पृ. ३८ ते ४६ पहा.

[2] वरील अधिनियमाच्या कलम २ द्वारे "(चालू राहणे)" हा मजकूर वगळण्यात आला.

✝ ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शविते.

* सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम ४ द्वारे सन २००१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २० निरसित करण्यात आला.

संक्षिप्त नाव व्याप्ती व प्रारंभ. **१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र वनविकास (शासनाकडून अथवा वनविकास महामंडळाकडून होणा-या वनोत्पादनाच्या विक्रीवरील कर) [1][**] अधिनियम, १९८३ असे म्हणावे.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू आहे.

(३) तो, दिनांक ७ डिसेंबर, १९८२ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

व्याख्या. **२.** या अधिनियमात संदर्भावरून अन्यथा अर्थ लावणे आवश्यक नसेल तर,-

(अ) " अपील प्राधिकारी " म्हणजे, वसुली अधिकारी हा, वन अधिकारी किंवा वनविकास महामंडळाचा अधिकारी असेल त्याबाबतीत, वसुली अधिका-याच्या निकट वरचा, यथास्थिति, वन विभागाचा किंवा वनविकास महामंडळाचा अधिकारी, आणि वसुली अधिकारी हा सहकारी संस्थेचा अधिकारी असेल त्याबाबतीत, ज्याच्या प्रादेशिक अधिकारितेत विक्री झाली असेल तो, यथास्थिति, विभागीय वन अधिकारी किंवा स्वतंत्र वन उप विभागाचा प्रभारी असलेला उपविभागीय वन अधिकारी. कोणत्याही विक्रीच्या संबंधात अपील प्राधिकारी कोण, असा प्रश्न उपस्थित झाल्यास, ते प्रकरण, मुख्य वन संरक्षकाकडे विचारार्थ पाठविले पाहिजे व त्याने त्यावर निर्णय दिला पाहिजे आणि त्याचा निर्णय अंतिम असेल;

(ब) " सहकारी संस्था " म्हणजे, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अन्वये नोंदण्यात आलेली किंवा नोंदल्याचे समजण्यात येणारी सहकारी संस्था; १९६१ चा महा. २४.

(क) " वनविकास महामंडळ " म्हणजे कंपनी अधिनियम, १९५६, याच्या अर्थानुसार खाजगी कंपनी असणारे आणि महाराष्ट्र राज्यात नागपूर येथे नोंदणीकृत कार्यालय असणारे, महाराष्ट्र वनविकास महामंडळ मर्यादित ; १९५६ चा १.

(ङ) " वनोत्पादन " म्हणजे, भारतीय वन अधिनियम, १९२७ हा, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात व्याख्या केल्याप्रमाणेचे वनोत्पादन,; १९२७ चा १६.

(ई) वनोत्पादनाच्या कोणत्याही विक्रीच्या संबंधात " वसुली अधिकारी " म्हणजे, यथास्थिति, ज्याने विक्री केलेली असेल असा वन अधिकारी, किंवा वनविकास महामंडळाचा अधिकारी किंवा सहकारी संस्थेचा अधिकारी, आणि त्या विक्रीच्या संबंधात वसुली अधिकारी कोण असा प्रश्न उपस्थित झाल्यास ते प्रकरण मुख्य वन संरक्षकाकडे विचारार्थ पाठविले पाहिजे व त्याने त्यावर निर्णय दिला पाहिजे आणि त्याचा निर्णय अंतिम असेल;

(फ) " विक्री " किंवा " वनोत्पादनाची विक्री " म्हणजे, राज्य शासनाने किंवा त्याच्या वतीने अथवा वनविकास महामंडळाने किंवा त्याच्या वतीने कोणत्याही वनोत्पादनाची रोख रकमेच्या मोबदल्यात किंवा लांबणीवर टाकलेल्या प्रदानाच्या मोबदल्यात किंवा अन्य किंमती मोबदल्यात केलेली विक्री,– मग त्या मोबदल्याच्या रकमेस विक्रीची किंमत वा खरेदी किंमत वा स्वामित्वधन म्हटलेले असो–आणि त्यात, राज्य शासनाच्या किंवा वनविकास महामंडळाच्या वतीने सहकारी संस्थेने केलेल्या वनोत्पादनाच्या कोणत्याही अशा विक्रीचा समावेश होतो;

(ग) " विक्रीची किंमत " म्हणजे, कोणत्याही खरेदीदाराने, त्याला विकलेल्या कोणत्याही वनोत्पादनासाठी दिलेली किंवा त्याने देणे असलेली, किंमत मोबदल्याची रक्कम – मग तिला विक्री किंमत वा खरेदी किंमत वा स्वामित्वधन म्हटलेले असो – आणि " विक्री " व " खरेदी " या शब्दांचा, त्यांच्या सर्व व्याकरणिक फेरबदलाचा आणि सजातीय संज्ञांचा अर्थ, तद्नुसार लावण्यात येईल;

[1] सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम २ द्वारे कंस व त्यामधील मजकूर वगळण्यात आला आणि तो नेहमीकरिता वगळण्यात आल्याचे मानण्यात येईल.

(ह) " कर " म्हणजे, राज्य शासनाने किंवा वनविकास महामंडळाने किंवा त्याच्या वतीने केलेल्या कोणत्याही वनोत्पादनाच्या विक्रीवर या अधिनियमान्वये आकारण्यात व गोळा करण्यात आलेला वन विकास कर ;

१९२७ चा १६. १९६१ चा महा. २४. (आय) या अधिनियमात वापरण्यात आलेल्या, परंतु त्यात व्याख्या न करण्यात आलेल्या शब्दांना व शब्दप्रयोगांना, यथास्थिति, भारतीय वन अधिनियम, १९२७ हा महाराष्ट्र राज्याला लागू असताना त्यात किंवा महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात, नेमून दिलेलाच अर्थ असेल.

**३.** (१) या अधिनियमाच्या तरतुदीस अधीन राहून, ७ डिसेंबर, १९८२ रोजी व त्यानंतर, वनोत्पादनाच्या प्रत्येक विक्रीवर राज्य शासनाकडून खरेदीदारावर त्याला विकण्यात आलेल्या वनोत्पादनाच्या विक्री किंमतीच्या [१] [बारा टक्के] दराने, कर आकारण्यात व गोळा करण्यात येईल. कर आकारणे व गोळा करणे.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा एखादी विक्री ७ डिसेंबर, १९८२ पूर्वी झालेली असेल आणि अशा विक्रीच्या अटी व शर्तीनुसार विक्री किंमतीची संपूर्ण रक्कम वा तिचा कोणताही भाग, उक्त तारखेस किंवा त्यानंतर देय असेल तर, अशा रीतीने देय असलेल्या विक्री किंमतीच्या संपूर्ण रकमेवर वा तिच्या भागावर या अधिनियमान्वये कोणताही कर आकारण्यात व गोळा करण्यात येता कामा नये नये.

१९५९ चा मुंबई ५१. (३) या अधिनियमाद्वारे बसविण्यात आलेला व देय असलेला कर, * मुंबई विक्रीकर अधिनियम, १९५९ किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याअन्वये त्याच वनोत्पादनाच्या विक्रीबाबत किंवा खरेदीबाबत बसवलेल्या व देय असलेल्या कराऐवजी नव्हे तर त्याव्यातिरिक्त असेल.

**४.** कोणत्याही वनोत्पादनाच्या विक्रीवर कलम ३ अन्वये बसवावयाच्या कराची रक्कम, विक्री करणा-या वसुली अधिका-याद्वारे खरेदीदाराकडून विक्री किंमतीबरोबर गोळा करण्यात आली पाहिजे : वसुली अधिका-यामार्फत कर वसुली.

परंतु, जेव्हा विक्रीची किंमत दोन किंवा अधिक हप्त्यांमध्ये देय असेल त्याबाबतीत, विक्री किंमतीच्या हप्त्यांबरोबर आणि त्या प्रमाणात, कराची रक्कमदेखील हप्त्यात वसूल करण्यात आली पाहिजे.

**५.** (१) कोणत्याही व्यक्तीकडून देय असलेल्या कराची रक्कम ठरवणा-या वसुली अधिका-याच्या आदेशामुळे किंवा वसुली अधिका-याने काढलेल्या इतर कोणत्याही आदेशामुळे व्यथित झालेल्या व्यक्तीस, अशा कोणत्याही आदेशाची सूचना मिळाल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आंत, अपील प्राधिका-याकडे अपील करता येईल. अपील प्राधिका-याने, असे अपील मिळाल्यानंतर अपीलकाराला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिली पाहिजे आणि त्या बाबीवर निर्णय दिला पाहिजे. कराच्या रकमेविरुध्द अपील.

(२) अपील प्राधिका-याकडे करावयाच्या अपिलास अधीन राहून, वसुली अधिका-याने दिलेला कोणताही आदेश, आणि अशा कोणत्याही अपिलावरील अपिल प्राधिका-याचा निर्णय हा अंतिम असेल.

**६.** या अधिनियमान्वये बसवलेल्या व गोळा केलेल्या कराचे उत्पन्न, प्रथम राज्याच्या एकत्रित निधीमध्ये जमा केले पाहिजे व त्यानंतर वसुली खर्च म्हणून राज्य शासन ठरवील अशी रक्कम वजा जाता उरलेली उत्पन्नाची रक्कम, या बाबतीत कायद्याने रीतसर केलेल्या विनियोजनानुसार दर वर्षी, अतिरिक्त अर्थसंकल्पीय तरतूद म्हणून, वन विभागाच्या स्वाधीन केली पाहिजे व ती केवळ वनरोपण यासाठी किंवा वनविकास कार्यक्रमाशी संबंधित इतर आनुषंगिक कारणांसाठी व वनात राहणा-या लोकांच्या, तसेच निर्वाहासाठी वनोत्पादनावर अवलंबून राहणा-या दुर्बल घटकांच्या कल्याणासाठी खर्च केली पाहिजे. कर उत्पन्नाचा विनियोग.

---

[१] सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, याच्या कलम ३ द्वारे " दहा टक्के " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

*आता मूल्यवर्धित कर अधिनियम, १९९९ (सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९) पहा.

कर भरण्या-पासून सूट.

**७.** राज्य शासन, ते लादील अशा शर्तीस (तशा शर्ती असल्यास) अधीन राहून, त्यास लोकहितार्थ तसे करणे आवश्यक वाटल्यास, विक्रीच्या कोणत्याही विनिर्दिष्ट वर्गाला, या अधिनियमाखालील देय कराची संपूर्ण रक्कम किंवा तिचा कोणताही भाग भरण्यापासून **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, सूट देऊ शकेल. ही सूट **शासकीय राजपत्रात** अधिसूचना प्रसिद्ध केल्याच्या तारखेपासून किंवा त्यात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा इतर तारखेपासून, अंमलात येईल.

जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे कराची थकबाकी वसूल करणे.

**८.** या अधिनियमाखाली देय अशी कराची सर्व थकबाकी ही जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे जिल्हाधिका-याकडून वसूल करण्यायोग्य असेल.

सद्‌भावपूर्वक केलेल्या कृत्याचे संरक्षण.

**९.** या अधिनियमान्वये सद्‌भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचा उद्देश असलेल्या कोणत्याही कृत्याबद्दल राज्य शासनाविरुद्ध किंवा राज्य शासनाच्या अथवा वनविकास महामंडळाच्या किंवा कोणत्याही सहकारी संस्थेच्या कोणत्याही अधिका-याविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेविषयक कार्यवाही दाखल करता येणार नाही.

नियम करण्याचा अधिकार.

**१०.** (१) पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीस अधीन राहून, राज्य शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियम करता येतील.

(२) या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो केल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीसाठी, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल, ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे संमती देतील किंवा नियम करण्यात येऊ नये याविषयी दोन्ही सभागृहांचे एकमत होईल तर, तो नियम, असा निर्णय **शासकीय राजपत्रात,** अधिसूचित झाल्याच्या तारखेपासून यथास्थिति, केवळ अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल किंवा अंमलात येणार नाही. तथापि, अशा फेरबदलामुळे किंवा विलोपनामुळे, त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

दिनांक ७ डिसेंबर, १९८२ पासून १६ जानेवारी, १९८३ पर्यंत सहकारी संस्थांनी केलेले विक्रीचे व्यवहार.

**११.** (१) शंकानिवारणार्थ, याद्वारे, असे घोषित करण्यात येते की, दिनांक ७ डिसेंबर, १९८२ पासून १६ जानेवारी, १९८३ पर्यंतच्या (दोन्ही दिवस धरुन) कालावधीमध्ये राज्य शासनाच्या किंवा वनविकास महामंडळाच्या वतीने कोणत्याही सहकारी संस्थेकडून करण्यात आलेले विक्रीचे व्यवहारसुद्धा या अधिनियमान्वये कर आकारणीस पात्र असतील आणि अशा विक्रीदाखल वसूल करण्यात आलेल्या कराच्या कोणत्याही रकमा या कायदेशीररीत्या आकारण्यात व गोळा करण्यात आल्याचे मानण्यात येईल. ७ जानेवारी, १९८३ रोजी (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त तारीख" असा केला आहे), अशा कोणत्याही विक्रीदाखल कराची कोणतीही रक्कम, वसूल करण्याचे राहून गेले असेल तर, खरेदीदाराने, अशी रक्कम उक्त तारखेपासून तीस दिवसांच्या आत विक्री करणा-या अधिका-यास दिली पाहिजे.

(२) पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या विक्रीदाखलच्या कराची कोणतीही वसुली केल्याने व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, उक्त तारखेपासून किंवा वसुलीच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत, यापैकी जी मुदत नंतरची असेल त्या मुदतीच्या आत, अपील प्राधिका-याकडे अपील करता येईल, व कलम ५ च्या तरतुदी शक्य असेल तेथवर, अशा कोणत्याही अपिलाच्या बाबतीत लागू होतील.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**१२.** या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्यात कोणत्याही अडचणी आल्यास, राज्य शासनास, परिस्थितीनुरुप अडचणी दूर करण्याच्या प्रयोजनासाठी, त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी कोणतीही गोष्ट, आदेशाद्वारे, करता येईलः

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेपासून दोन वर्षांचा कालावधी संपल्यानंतर, असा कोणताही आदेश काढता येणार नाही.

सन १९८३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३ याचे निरसन व व्यावृत्ती.

१९८३ चा महा. अध्या. ३.

**१३.** (१) महाराष्ट्र वन विकास (शासनाकडून अथवा वनविकास महामंडळाकडून होणा-या वनोत्पादनाच्या विक्रीवरील कर) (चालू राहणे) अध्यादेश, १९८३ याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

(२) असे निरसन करण्यात आले असले तरीही, उक्त अध्यादेशान्वये (काढलेली कोणतीही अधिसूचना किंवा आदेश धरुन) केलेली कोणतीही गोष्ट किंवा कृती ही, या अधिनियमाच्या तत्सम उपबंधान्वये केलेली गोष्ट किंवा यथास्थिती कृती किंवा काढलेला आदेश वा अधिसूचना असल्याचे मानण्यात येईल.

---

शामुना-एच-२००८-सभासंमरामुं-०१-२०१५-५५४२-प्रती-पीसी ४*

## महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

- **संचालक**
  मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय,
  महाराष्ट्र राज्य
  नेताजी सुभाष मार्ग, मुंबई-४०० ००४.
  *दूरध्वनी : ३५९१४६*

- **पर्यवेक्षक**
  शासकीय ग्रंथागार
  (केंद्र शासनाच्या व महाराष्ट्र राज्य शासनाच्या प्रकाशनाकरिता)
  (फक्त स्थानिक विक्रीकरिता)
  युसुफ बिल्डिंग, दुसरा मजला, खो. नं. २१,
  वीर नरीमन रोड (हुतात्मा चौकाजवळ),
  मुंबई-४०० ००१.
  *दूरध्वनी : २९७१९४*

- **पर्यवेक्षक**
  शासकीय ग्रंथागार
  बडवे बिल्डिंग भांडारकर इन्स्टिट्यूट मार्ग,
  पी. वाय. सी. जिमखान्याजवळ, पुणे-४११ ००४.
  *दूरध्वनी : ५६७५९*

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार
  सिव्हील लाईन्स, नागपूर-४४० ००१.
  *दूरध्वनी : २५६२६१५*

- **पर्यवेक्षक**
  शासकीय ग्रंथागार
  शहागंज, गांधी चौकाजवळ,
  औरंगाबाद–४३१ ००१.
  *दूरध्वनी : ५५२५*

**महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते**